REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# दलित साहित्य समीक्षा : गरज व कारणे



डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा, ता. परंडा जि. उस्मानाबाद.

## १. प्रास्ताविक

साहित्य विश्वात मराठी लेखकांना व साहित्यांना विशेष महत्व आहे. प्रत्येक साहित्यीक हा आपापल्या पध्दतीने, विचाराने अनुभवाने साहित्यनिर्मिती करत असतो. मराठी साहित्य विश्वाला देखील एक परंपरा आहे. संत साहित्य ते आधुनिक साहित्य हा प्रवास खरंच ऐतिहासिक आहे. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उतरत असते. दलित साहित्य हे देखील तात्कालीन समाजव्यवस्थेची निर्मितीच म्हणावे लागेल. दलित साहित्य हे यासाठी वेगळे म्हणावी लागेल की या साहित्याची वेगळी समीक्षा मांडण्यात येते. आंबेडकरी विचाराने किंवा तत्कालीन समाजव्यवस्थेने निर्माण केलेले साहित्य समाजाला नवी प्रेरणा व दिशा देणारे ठरले. दलित साहित्य समीक्षेची गरज साहित्यीकांना का जाणवली व त्याची कारणे कोणती हे पाहणे आवश्यक आहे.

## २. दलित साहित्याचा अर्थ :-

तत्कालीन कालखंडात दलितांवर जो अन्याय झाला. त्यातूनच दलित साहित्य उदयास आले. आपले विचार, अन्यायाविरुध्द, शोषणाविरुध्द असणारी चीड, व्यवस्थेचा धिक्कार करण्यासाठी दलित साहित्य उदयास आले.

दलितांमधील माणुस जागा झाला, जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन त्यामुळे दलितांना मिळाला. यातूनच दलित साहित्य उदयास आले.

## ३. दलित साहित्य समीक्षेची गरज :-

दलित साहित्य समीक्षेचा विचार केला तर त्याची गरज जाणवते. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे, बिंधुमाधव इत्यादी लेखक धर्मांतरापुर्वी लेखन करीत होते पण त्यांच्या साहित्याने मराठी समीक्षेला आवाहन केले नाही. त्याच्या साहित्यात तत्कालीन व्यवस्थेवर आसूड ओढला, लोकांची मने प्रज्वलित केली पण समीक्षा करावी अशी स्थिती नव्हती.

१९६० च्या नंतर जे दलित साहित्य उदयास आले त्यात तरुण पिढीने दलित साहित्य वेगळया, उंचीवर नेवून ठेवले. तरुण पिढी आंबेडकरी विचाराने, प्रेरणेने, भारावून लिहित होती. त्यात प्रामुख्याने नामदेव ढसाळ, बाबूराव बागूल यांच्या सारख्या लेखकांचा उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यांच्या लेखनाने मराठी समीक्षेपुढे नवे प्रश्न निर्माण केले.

दलित साहित्याची स्वतंत्र समीक्षा करण्याची गरज भासू लागली. दलित साहित्य समीक्षेची कोणती कारणे आहेत ते आपण पाहू.

## ४. दलित साहित्य समीक्षेची कारणे :-

१) दलित साहित्य हे केवळ वाड्:मयीन चळवळ नसून तो एक जीवन जगण्याचा दृष्टिकोन आहे. असे दलित साहित्यीकांचे मत होते.

२) दलित साहित्य समीक्षेव्दारे साहित्यातून देण्यात येणारा संदेश लोकांपर्यंत पोहचावा हा उद्देश होता. स्वातंत्र्य, समता आणि भितीशून्यता मिळावी म्हणून दलित साहित्य चळवळ उभी राहिली.

३) डॉ. म.ना.वानखेडे यांनी असे नमूद केले आहे की दलित साहित्य म्हणून दलित लेखकांनी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य या साहित्याची योग्य समीक्षा होणे वाचकांसाठी गरजेचे होते. योग्य संदेश वाचकांपर्यंत जावा हा त्यामागचा हेतू.

४) दलित साहित्य समीक्षा ही दलित लेखकांच्या साहित्यकृतीला तसेच आंबेकडकरी विचारांना कृतीला न्याय देण्यासारखेच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराचा संघर्ष, लढे, विचार, लोकशाही, समाजवादाचा आशय व दलितांना सांस्कृतिक मानसीक

गुलागीरीतून मुक्त करण्यासाठी आपल्या लाखो अनुयायांसोबत केलेले धर्मांतर इत्यादी बाबी दलित साहित्यावर खूप परीणाम करुन गेल्या. हे सर्व दलित साहित्य समीक्षेमुळे वाचकांसमोर आले.

५) दलित साहित्याने जो नकार आणि विद्रोह मांडला तो इथल्या वरिष्ठ वर्ग, जातियांचे सत्ताधारी वर्गाचे ज्ञानावर, शास्त्रावर अधिकार सांगणाऱ्यांचे वर्चस्व नाकारण्यासाठी होते. त्यामुळेच दलित साहित्य समीक्षा गरजेची वाटते. समीक्षेतून या सर्व बाबी समोर येतात.

६) दलित साहित्य समीक्षेतून आणखी एक बाब समोर येते ती म्हणजे दलित साहित्याचा आधार ही काही मूल्ये होती ती म्हणजे शोषणाचा व विषमतेची आधार मूल्ये जी दलित साहित्याने नाकारली.

७) दलित साहित्य समीक्षा ही गरजेची वाटू लागली कारण त्याची मांडणी, शैली, विचार, ध्येये ही इतर साहित्यांपेक्षा वेगळी होती. ती आंबेडकरी विचाराने प्रेरणेने, समाजवादी, मार्क्सवादी, शैली शास्त्रीय दृष्टिकोनातून निर्माण झाली होती.

८) दलित साहित्याचा पाया हा डॉ. आंबेडकर व मार्क्स यांच्या विचारांचा व तात्विक, वैचारिक प्रेरणा हा मानला जातो. दलित साहित्य समीक्षा करताना हा मुद्दा प्रकर्षाने जाणवतो.

## ५. समारोप :-

अशा प्रकारे दलित साहित्य प्रकारची समीक्षा विविध अंगाने गरजेची वाटू लागते. दलित साहित्य समीक्षा हा दलित लेखकांना त्यांच्या लेखन साहित्याला योग्य न्याय, देण्याचे काम करते. त्यांचे विचार, तत्वे संघर्ष वाचकांपर्यंत पोहचते. त्यामुळेच दलित साहित्य समीक्षा गरजेची आहे.

## संदर्भ ग्रंथ

१. कुंभार प्रकाश - दलित कथा साहित्य, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.
२. मांडे प्रभाकर - (१९९७).दलित साहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद